



सायं • दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६३ वा | शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# ‘देशद्रोही’ ज्ञानेश कुमारांना तुरुंगात डांबा...!

## मोदी शहासह फडणवीसांचे ‘बोगस सरकार’...!! विरोधकांचा घणाघात

नवी दिल्ली (वृत्त सेवा):- देशातील निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि विश्वासार्ह ठेवण्याची घटनात्मक जबाबदारी असलेल्या निवडणूक आयोगाच्या अंतर्गत कारभारावरच आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय आयोगातील दोन निवडणूक आयुक्तांनी गेल्या दहा महिन्यांत तब्बल १४ वेळा अधिकृतरीत्या आक्षेप नोंदविल्याचा धक्कादायक खुलासा ‘इंडियन एक्स्प्रेस’च्या तपासणीत झाला आहे. विशेष म्हणजे हे आक्षेप मतदारांची नावे समाविष्ट करणे-वगळणे, ‘फॉर्म-६’मधील बदल, मतदारयादीच्या डिजिटल डेटाबेसचे केंद्रीकरण आणि एसआयआरच्या प्रक्रियेतील निर्णय यांसारख्या निवडणूक प्रक्रियेच्या गाभ्याशी संबंधित आहेत.

निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी आयोगाच्या विविध निर्णयांबाबत नोंदविलेल्या आक्षेपांमुळे देशातील सर्वांत महत्त्वाच्या घटनात्मक संस्थांपैकी एका संस्थेतील अंतर्गत मतभेद उघड झाले आहेत. ‘इंडियन एक्स्प्रेस’च्या अहवालानुसार, दोन्ही आयुक्तांनी काही निर्णय त्यांच्या माहितीशिवाय किंवा आवश्यक मंजुरीशिवाय घेतले जात असल्याचे नमूद केले. अंतर्गत पातळीवर प्रश्न उपस्थित करूनही समाधानकारक तोडगा निघाला नसल्याने त्यांनी थेट कॅबिनेट सचिवांकडेही तक्रारी केल्या.

**‘फॉर्म-६’ बदलावर थेट ‘अनधिकृत, बेकायदेशीर’ हरकत**

नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ‘फॉर्म-६’मध्ये एसआयआरशी संबंधित अतिरिक्त प्रश्न समाविष्ट करण्यात आला. नव्या अर्जदाराने किंवा त्याच्या आई-वडिलांनी अथवा आजी-आजोबांनी मागील एसआयआरच्या मतदारयादीत अस्तित्वात असल्याचे नमूद करणे आवश्यक असल्याचे या बदलातून समोर आले.

या बदलाबाबत निवडणूक आयुक्त विवेक जोशी यांनी मे महिन्यातच नियमांमध्ये बदल केल्याशिवाय असा बदल करता येणार नसल्याचा आक्षेप नोंदविल्याचे ‘इंडियन एक्स्प्रेस’ने म्हटले आहे. त्यानंतर संधू यांनी १३ ऑगस्ट रोजी हा बदल ‘अनधिकृत आणि बेकायदेशीर’ असल्याचे नोंदवून तो तातडीने हटविण्याची मागणी केली होती.



**मतदारयादीच्या डेटाबेसच्या केंद्रीकरणावरही लाल झेंडा**

निवडणूक आयोगाच्या कामकाजातील महत्त्वाचा आधार म्हणजे मतदारयादी तयार करण्याची प्रक्रिया स्थानिक पातळीवरील वैधानिक अधिकाऱ्यांमार्फत होणे. मात्र, मतदारयादीच्या डिजिटल व्यवस्थेवर दिल्लीतील केंद्रीय नियंत्रण वाढत असल्याची चिंता दोन्ही आयुक्तांनी व्यक्त केल्याचे तपासणीत समोर आले आहे.

विवेक जोशी यांनी मे महिन्यात मतदारयादीच्या डेटाबेसचे ‘हळूहळू केंद्रीकरण’ होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. संबंधित वैधानिक अधिकाऱ्यांशिवाय अन्य कोणालाही मतदार डेटाबेसमध्ये बदल करण्याचे अधिकार नसावेत आणि त्यासाठी ऑडिट करावे, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. त्यानंतर संधू यांनी राज्यस्तरीय निवडणूक अधिकाऱ्यांना प्रणालीवर पूर्ण आणि योग्य प्रवेश मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

**गोव्यात ९७ मतदारांचा मुद्दा ऐरणीवर**

या केंद्रीकरणाच्या परिणामाबाबत गोव्यातील प्रकरणाचाही ‘इंडियन एक्स्प्रेस’ने उल्लेख केला आहे. स्थानिक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांनी ९७ मतदारांना आवश्यक कागदपत्रे तपासून पात्र ठरविले होते; मात्र केंद्रीय सॉफ्टवेअर प्रणालीमुळे त्यांच्या निर्णयांची नोंद अंतिम यादीत करता आली नसल्याचे अहवालात नमूद आहे. या प्रकरणामुळे तळागाळातील वैधानिक अधिकाऱ्यांच्या अधिकारांवर डिजिटल व्यवस्थेच्या केंद्रीकृत नियंत्रणाचा परिणाम होतो का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**पश्चिम बंगालमध्येही प्रश्नांची मालिका**

एसआयआर प्रक्रियेवरून पश्चिम बंगालमध्येही मोठा वाद निर्माण झाला आहे. ‘इंडियन एक्स्प्रेस’च्या अहवालानुसार, सर्वोच्च न्यायालयाने या प्रक्रियेतील काही बाबींमध्ये हस्तक्षेप करून न्यायिक अधिकाऱ्यांमार्फत प्रकरणे हाताळण्याची व्यवस्था केली. आयोगाच्या माहितीनुसार, एसआयआर प्रक्रियेशी संबंधित मोठ्या संख्येने अपील प्रलंबित आहेत. या अपिलांच्या प्रक्रियेबाबतही संधू यांनी आयोगाकडे प्रश्न उपस्थित केले होतेविशेषतः आयोगाच्या वतीने अपील दाखल करण्याचा अधिकार कोणाला देण्यात आला आणि ते प्रत्यक्षात कोणी दाखल केले, याबाबत त्यांनी माहिती मागितली होती.

**चार महिने पूर्ण बैठकच नाही?**

‘इंडियन एक्स्प्रेस’च्या तपासणीनुसार, मे ते ऑगस्ट या कालावधीत पूर्ण निवडणूक आयोगाची बैठक झाल्याचे आढळले नाही. त्याच काळात आयोगातील दोन्ही आयुक्तांकडून विविध निर्णयांवर आक्षेप नोंदविले जात होते. अखेर ९ सप्टेंबर रोजी मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन्ही आयुक्तांची पूर्ण बैठक झाली.

ही बाब निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता, परस्पर सल्लामसलत आणि संस्थात्मक समन्वय कितपत आहे, यावर प्रश्न उपस्थित करणारी ठरली आहे.

**१३ कोटी मतदारांच्या नोंदींचा विषय; देशभर एसआयआरचा विस्तार-** एसआयआरची सुरुवात बिहारमध्ये जून २०२५ मध्ये झाली आणि त्यानंतर ती अनेक राज्ये व केंद्रशासित प्रदेशांत विस्तारली. ‘इंडियन एक्स्प्रेस’च्या तपासणीनुसार, ३० राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील मसुदा मतदारयादीत १३ कोटींपेक्षा अधिक नावे वगळली गेल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रक्रियेमुळे कोण पात्र मतदार आहे आणि कोणाचे नाव मतदारयादीत राहणार, याबाबत निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर देशभरात तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

मात्र, या आकडेवारीचा अर्थ सर्व १३ कोटी व्यक्ती कायमस्वरूपी मतदानाच्या अधिकारापासून वंचित झाल्या असा थेट निष्कर्ष काढता येत नाही. एसआयआर ही मतदारयादीच्या पुनरावलोकनाची प्रक्रिया असून समावेश, वगळणे आणि अपील यासाठी विविध टप्पे आहेत. पश्चिम बंगालमध्येही मोठ्या संख्येने अपील प्रलंबित असल्याचे आयोगाने न्यायालयात सांगितले आहे.

विरोधकांचा आयोगावर

(पान २ वर)

**विरोधकांनी ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात तीव्र शब्दांत आरोप करत त्यांच्या कारवाईची मागणी केली आहे. तसेच केंद्रातील मोदी-शहा आणि राज्यातील फडणवीस सरकारच्या कारभारावरही विरोधकांनी जोरदार टीका केली.**

**CJP चा देशव्यापी आंदोलनाचा इशारा**

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी;SIR थांबवण्यासह तीन मागण्यांसाठी आंदोलनाची घोषणा. CJP चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी दिल्लीतील पत्रकार परिषदेत भूमिका मांडत मागण्या मान्य न झाल्यास देशभर आंदोलन आणि ‘जंतर-मंतर २.०’ची घोषणा केली.**

## दक्षिण सोलापूर तालुका शिक्षक संघाचे “आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक” पुरस्कार जाहीर

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ व महिला आघाडी यांच्या वतीने देण्यात येणारे यंदाचे “आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्कार,आदर्श शाळा, गुणवंत अधिकारी व कर्मचारी पुरस्कार” जाहीर करण्यात आले. शिक्षक संघाचे अध्यक्ष महिबूबसाब सवार व मंद्रूप पतसंस्थेचे चेअरमन प्रकाश कुंभार यांनी प्रसिद्धीस दिले.पुरस्काराचे यंदाचे १४ वे वर्ष असून पुरस्कार वितरण समारंभ व मंद्रूप पतसंस्थेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता कटगेरी मंगल कार्यालय,ओम गर्जना चौकापुढे, रेणुका नगरी शिक्षक सोसायटी,जुळे सोलापूर येथे संपन्न होणार आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांच्या शुभहस्ते, सेवानिवृत्त शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष शिवानंद भरले यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्काराचे वितरण होणार असून प्रमुख अतिथी म्हणून दक्षिण सोलापूर पं.सं.चे सभापती संदीप टेळे,प्रमुख उपस्थिती जिल्हा परिषद सदस्य सौ.लक्ष्मीबाई पाटील व गटशिक्षणाधिकारी दक्षिण सोलापूर श्रीमती जयश्री सुतार,तर प्रतिमापूजन गट विकास अधिकारी दक्षिण सोलापूर मनोज राऊत यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्य सर्वश्री नेताजीभाऊ खंडागळे,मा.श्रुती भोरगुंडे,सोनाली कडते,सौ.सविता उंबरजे,सौ.वर्षा पटणे - उपसभापती, दक्षिण सोलापूर, पं.स.सदस्य सर्वश्री/सौ. सौ.शिल्पा बिराजदार,सौ.अंबिका पाटील,सौ.प्रियंका कुबसंगे, सौ.प्रियंका आसबे,सौ.अंबिका दुपारगुडे,मळसिध्द मुगळे,विजय राठोड,बलवान गोतसुर्वे,पंचप्पा धनशेट्टी,सुरज पाटील, गुरुबाळ सनके,मल्लिनाथ स्वामी,विरभद्र यादवाड,शिवाजी पाटील,सिध्दाराम कटगेरी,रेवणसिध्द हत्तुरे, राजकुमार बिज्जरगी, काळप्पा सुतार, बादशाह मुल्ला, सुभाष फुलारी, दयानंद वठारे,म.हयात पाटील, श्रीम. नजमुन्निसा मुजावर, सतीश वाले, बालाजी गुरव आदी उपस्थित राहणार आहेत.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकूण १३ केंद्रातून प्रत्येकी एक याप्रमाणे १३ शिक्षक उर्दू १ कन्नड १ अक्कलकोट तालुक्यातील १ अशा १६ शिक्षकांचा,केंद्र प्रमुख १, व २ गुणवंत अधिकारी व कर्मचारी व ४ शाळांचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.



“आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्काराने“ यांचा होणार सन्मान- संतोषकुमार लाट (शिंगडगाव), श्रीम. मनिषा किशोर पाटील (दोड्डी-तांडा), श्रीम.जियाबानो जहीर अहमद रंगरेज (बोरामणी उर्दु), अप्पासाहेब बसवराज बिराजदार(विडी घरकुल ब मुली),अमरसिंग जयपालसिंग राजपूत(वडजी),श्रीम.संगीता शिवशंकर बिराजदार(इ.ल. तांडा), श्रीम.सुनिता प्रभाकर जाधव (होटगी), सौ.अर्चना जिवराज फुलारी (इंगळगी), दिलशाद रतनपाशा शेख (टाकळी नवा), रामसिंग तुकाराम पवार(होनमुर्गी), सौ.आशा बबन मुळीक (कंदलगाव), गुरुबाळा चंद्रशा बगले(लवंगी), आमसिद्ध विठ्ठल पुजारी (संगमेश्वर नगर-भंडारकवठे), गौराबाई काशिलिंग बंगले (शेगाव अक्कलकोट), विजय वसंत गेंगाणे (केंद्रप्रमुख कुंभारी) गुणवंत कर्मचारी- तात्यासाहेब साहेबराव सातपुते

विषय-साधनव्यक्ती पंचायत समिती दक्षिण सोलापूर

श्रीम.सना बेगम बशीर अहमद करजगी

कनिष्ठ सहाय्यक लेखा

जिल्हा परिषद सोलापूर

“आदर्श शाळा” पुरस्कार प्राप्त शाळा-१) जि.प.प्राथमिक उर्दू शाळा,बोरामणी (बीट वळसंग)

२) जि.प.प्राथमिक मराठी शाळा यत्नाळ (बीट कुंभारी)

३)जि.प. प्राथमिक मराठी शाळा बरूर (बीट होटगी)

४) जि.प.प्राथमिक मराठी शाळा इंदिरानगर-मंद्रूप (बीट मंद्रूप)

तसेच सेवानिवृत्त शिक्षक बांधव व नूतन केंदाप्रमुख यांचाही यावेळी यथोचित सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्याताई जगताप,मल्लिनाथ पुजारी,भिमराव पाटील,सिद्धाराम विजापूरे,पिरप्पा हडपद,सिद्धाराम स्वामी,डॉ.नागनाथ येवले,विनोद कोळी,चिंनगीबादशहा कोटनाळ, वसिम शेख,श्रीशैल बिराजदार, संतोषकुमार मनगोंडे, शिवशरण म्हेत्रे, श्रीशैल सुतार, संजय देवकते,संजय कोरे, केदारनाथ चौगुले,शिवय्या मसुती, शंकर म्हेत्रे, सुनील बिराजदार, विजय बिराजदार, मुनीर बारूदवाले, संगप्पा मेनकाळे, कांतीलाल गुमतापुरे, शंकर बिराजदार,शांतप्पा कांबळे, रब्बीलाल मुल्ला, दयानंद कोरे, शिवानंद बिदरकोटे, अपेक्षा रणदिवे, रेखा स्वामी, अनिता गंभीरे, बद्रुनिस्सा सगरी, अंजली जमखंडीकर, सुनिता वनस्कर, अंजली नाटेकर, अंजली राऊत, कमल आणची आदि शिक्षक बंधू-भगिनी प्रयत्न करीत आहेत.

## आहार, विहार, निद्रा ही त्रिसूत्री उत्तम असेल तर जीवनशैली उत्तम- डॉ. शेंडगे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आहार, विहार आणि निद्रा या त्रिसूत्रीचा योग्य पद्धतीने अवलंब केल्यास जीवनशैली निरोगी



राहण्यास मदत होते. बैठे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी विशेषतः आहाराच्या वेळा, व्यायाम आणि पुरेशी झोप याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शिळे अन्न टाळावे, सकाळचा नाश्ता पौष्टिक असावा आणि जेवणाच्या वेळा नियमित ठेवाव्यात, असे मार्गदर्शन डॉ. विद्या शेंडगे यांनी केले. मनोरमा पावन गणपती पूजनिमित्त मनोरमा मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीतर्फे जीवनशैली व आहार या विषयावर मनोरमा सांस्कृतिक भवन येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे होत्या. व्यासपीठावर बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे, डॉ. सत्यजित वाघचवरे, डॉ. शुभांगी वाघचवरे आणि सीईओ शिल्पा कुलकर्णी उपस्थित होते. रात्रीचे जेवण शक्यतो सात वाजेपर्यंत करावे. रात्री हलका आहार घ्यावा. जेवणानंतर किमान १५ मिनिटे शतपावली करावी. पुरेशी झोप घेतल्यास आरोग्याच्या अनेक समस्या टाळण्यास मदत होते. पावसाळ्यात


(पान २ वर)




## सोलापूर गणेश विसर्जन: अत्याधुनिक ड्रोनची नजर, ध्वनियंत्रणेवर बंदी अन्? पोलिसांचा कडक पहारा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गणेशोत्सवाच्या सांगता विसर्जन मिरवणुका शांततेत, निर्विघ्न आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. शुक्रवारी ( २५ सप्टेंबर) निघणाऱ्या मुख्य विसर्जन मिरवणुकांवर एआय ड्रोन तसेच सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे लक्ष ठेवण्यात येणार आहे.

विसर्जन मार्गांवरील दोन हजारांहून अधिक खड्डे बुजवून रस्ते दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले असून, एकूण तब्बल ४५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे उभारण्यात आली आहेत.



जिल्ह्यात यंदा १ हजार ५०० लहान आणि १ हजार ४८८ मोठ्या सार्वजनिक मंडळांनी श्रींची प्रतिष्ठापना केली आहे. बहुतांश प्रमुख मंडळांच्या मिरवणुका शुक्रवारी निघणार असल्याने महापालिकेने आठही विभागीय कार्यालयांतर्गत (झोन) नियोजन केले आहे. मिरवणूक मार्गांवर अडथळा ठरणारे खड्डे डांबराचा वापर करून बुजवण्यात आले. त्याप्रमाणे मिरवणूकीस अडथळा ठरणार्या झाडांच्या फांद्यांची छाटणी, पथदिव्यांची दुरुस्ती आणि रात्रीच्या मिरवणुकीसाठी उच्च क्षमतेच्या फोकस लाइटची व्यवस्था करण्यात आली आहे.

**आठ विसर्जन कुंड, २०० जीवरक्षक सज्ज**

शहरातील हिप्परगा तलाव, नीलम नगर ते सुनील नगर मार्ग, प्रिसिजन कारखान्याशेजारील म्हाडा विहीर, जुना विडी घरकुल, छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव), राजसवनगर विहीर, गणपती घाट (दत्त चौक), विष्णू घाट (पासपोर्ट कार्यालयाजवळ) आणि जुनी लक्ष्मी विष्णू चाळ येथे विसर्जनाची सोय करण्यात आली आहे.

तलावांतील गाळ उपसला असून, सुरक्षिततेचा उपाय म्हणून गणपती घाटावरील कारंजे तात्पुरते हटवले जाणार आहेत. प्रत्येक कुंडावर महापालिकेचे आरोग्य निरीक्षक आणि एकूण २०० हून अधिक प्रशिक्षित जीवरक्षक तैनात आहेत.

पोलिस बंदोबस्त, स्वतंत्र व कडक कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहर आणि ग्रामीण भागात मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. सोलापूर शहरात : ३ पोलीस उपायुक्त, ८ सहायक पोलीस आयुक्त, २४ पोलीस निरीक्षक, ९० सहायक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, १ हजार ३०२ पोलीस अंमलदार, ४३६ होमगार्ड आणि एसआरपीएफची एक कंपनी तैनात करण्यात आली आहे.

ग्रामीण भागात : १२८ अधिकारी, १ हजार १०० होमगार्ड, एसआरपीएफची एक कंपनी, ३ आरसीपी पथके आणि ४ शीघ्र कृती दल सज्ज आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील २५८ गावांमध्ये एक गाव, एक गणपती उपक्रम राबवण्यात आला असून अनेक मंडळांनी जागेवरच विसर्जन करण्याचा निर्णय घेतल्याने ग्रामीण पोलिसांवरील ताण हलका झाला आहे.

## संपादकीय

# घोषणांचा पाऊस, शेतकऱ्यांच्या पदरी दुष्काळ!

महाराष्ट्रातील शेतकरी आज संकटाच्या गर्तेत आहे. पाऊस लहरी झाला, पिकांचे नुकसान झाले, उत्पादन हातातून गेले आणि कर्जाचा डोंगर मात्र कायम राहिला. अशा वेळी सरकारकडून कोट्यवधी रुपयांच्या मदतीच्या घोषणा केल्या जातात. आकडे ऐकून काही काळ शेतकऱ्याला दिलासा मिळतो; पण घोषणेतील आकडा आणि शेतकऱ्याच्या खात्यात जमा झालेली रक्कम यातील अंतर किती आहे, हा खरा प्रश्न आहे.

हा घ्या पुरावा म्हणत, आ. रोहित पवार यांनी फेसबुक पेजवर शासनाच्या वेबसाईटच्या स्क्रिनचे फोटो टाकले आहेत व पुढील मजकूर लिहिला आहे. मुख्यमंत्री खोटे बोलण्यात आणि आकडे फुगवून सांगण्यात अतिशय पटाईत आहेत. गेल्या वर्षी ३२,००० कोटींचे पॅकेज जाहीर केले, पण प्रत्यक्षात मात्र १५,००० कोटीदेखील मिळाले नाहीत. हेक्टरी १७,५०० रुपये देऊ, अशी घोषणा केली; पण प्रत्यक्षात काहीच मिळाले नाही. मुख्यमंत्र्यांच्या हिशोबाने पीकविम्याचे ५ ते ७ हजार कोटी मिळायला हवे होते, पण राज्यातील शेतकऱ्यांना केवळ १,९०० कोटी मिळाले. केंद्र, राज्य आणि शेतकरी मिळून विमा कंपन्यांना २,३९४ कोटींचा विमा हप्ता जमा झाला; दुर्दैवाने तेवढी रक्कमदेखील शेतकऱ्यांना मिळाली नाही.

मराठवाड्यात मुख्यमंत्र्यांच्या हिशोबाने पीकविम्याचे ५,२०० कोटी मिळायला हवे होते; परंतु प्रत्यक्षात केवळ १,५०० कोटी मिळाले. मराठवाड्यात जिल्हानिहाय किती पीकविमा मिळाला, याचा चार्ट सोबत देत आहे. मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण द्यावे... पीकविमा योजनेतील महत्त्वाचे ट्रिगर काढून सरकारने विमा कंपन्यांशी साटेलोटे साधले... शेतकऱ्यांशी दगाफटका केला... हे मात्र नक्की!

दुष्काळ पीकविमा बळीराजा शेतकरी शेतकऱ्यांचाआवाज कृषीसंकट

त्याच बरोबर सर्वच विरोधकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत गेल्या वर्षी जाहीर केलेल्या ₹३२ हजार कोटींच्या पॅकेज पैकी ₹१५ हजार कोटी रुपये ही वाटप झाले नाही. हेक्टरी ₹१७,५०० मदतीपर्यंत अनेक दाव्यांचा हिशोब मागितला आहे. पीकविम्याच्या रकमेतही मोठी तफावत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आता या आरोपांवर सरकारने भावनिक प्रतिक्रिया देण्याऐवजी कागदोपत्री उत्तर द्यावे.

सरकारने सांगावे ₹३२ हजार कोटींच्या पॅकेजपैकी प्रत्यक्ष किती रुपये वितरित झाले? किती शेतकऱ्यांना मिळाले? कोणत्या जिल्ह्याला किती मिळाले? हेक्टरी ₹१७,५०० मदतीच्या घोषणेचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांना झाला?

आणि पीकविम्याचा तर स्वतंत्र हिशोबच हवा. शेतकरी, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्या माध्यमातून विमा कंपन्यांकडे किती प्रीमियम जमा झाला? त्या बदल्यात शेतकऱ्यांना किती नुकसानभरपाई मिळाली? किती दावे मंजूर झाले? किती नाकारले गेले? नाकारण्याची कारणे काय? कोणत्या जिल्ह्यात किती रक्कम वितरित झाली?

या प्रश्नांची उत्तरे एका क्लिकवर उपलब्ध व्हायला हवीत. कारण पीकविमा ही शेतकऱ्यावर उपकाराची योजना नाही. शेतकरी प्रीमियम भरतो, सरकार आपला हिस्सा भरते आणि त्याच्या बदल्यात पिकाच्या नुकसानीच्या वेळी विमा संरक्षण मिळणे अपेक्षित असते. मग नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यालाच कार्यालयांच्या फेऱ्या का माराव्या लागतात?

पीकविमा योजनेतील 'ट्रिगर' आणि नुकसानभरपाईचे निकष बदलले असतील, तर त्याची संपूर्ण माहिती सरकारने शेतकऱ्यांसमोर ठेवावी. विमा कंपन्यांना फायदा मिळवून देण्यासाठी नियम बदलल्याचा आरोप होत असेल, तर सरकारने तो आरोप आकडेवारीसह खोडून काढावा. आरोप खोटा असेल तर अधिकृत आकडे जाहीर करा; आरोप खरा असेल तर जबाबदारी निश्चित करा.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांची अवस्था तर आणखी गंभीर आहे. दुष्काळसदृश परिस्थिती, पावसातील खंड आणि पिकांचे नुकसान यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत मदतीच्या घोषणांपेक्षा वेगवान पंचनामे, पारदर्शक विमा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष आर्थिक मदत हीच शेतकऱ्यांची खरी गरज आहे.

सरकारकडे प्रशासन आहे, यंत्रणा आहे, डिजिटल व्यवस्था आहे आणि हजारो कोटींची आकडेवारी आहे. मग जिल्हानिहाय मदतीचा हिशोब सार्वजनिक करण्यास अडचण कोणती?

मुख्यमंत्र्यांनी एकदा सर्व आकडे समोर ठेवावेत. घोषित निधी किती? मंजूर निधी किती? प्रत्यक्ष वितरित निधी किती? लाभार्थी शेतकरी किती? पीकविमा प्रीमियम किती? विमा कंपन्यांनी दिलेली नुकसानभरपाई किती?

दावे प्रलंबित किती? नाकारलेले दावे किती? हा हिशोब जनतेसमोर आला की आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा आपोआप खाली बसेल.

आज शेतकऱ्याला कोणत्याही पक्षाचा प्रचार नको. त्याला त्याच्या घामाचा मोबदला आणि नुकसानीची भरपाई हवी आहे. सरकारने आकडे फुगवले की नाही, हा राजकीय वाद असू शकतो; पण शेतकऱ्याच्या खात्यात प्रत्यक्ष किती पैसा पोहोचला, हा सार्वजनिक हिशोबाचा विषय आहे. म्हणून सरकारने घोषणांच्या आकड्यांवर न थांबता प्रत्यक्ष वितरणाची आकडेवारी जाहीर करावी. विमा कंपन्यांनीही जिल्हानिहाय दावे आणि देयकांचा तपशील सार्वजनिक करावा.

शेतकऱ्याला आश्वासनांचे कागदी पीक नको; त्याच्या खात्यात मदतीचे खरे पीक हवे! आता वेळ आली आहे.

घोषणांची नव्हे, हिशोबाची! आश्वासनांची नाही, अंमलबजावणीची! आकड्यांची नाही, शेतकऱ्याच्या खात्यातील पैशांची!

## * पान १ वरुन *

*** निवडणूक आयोगातच मतभेदांचा.....**

हल्लाबोल

या तपासणीनंतर विरोधी पक्षांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले असून सर्वोच्च न्यायालयाने एसआयआरच्या प्रक्रियेकडे अधिक बारकाईने पाहावे, अशी मागणीही करण्यात येत आहे. राहुल गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव यांच्यासह विरोधी नेत्यांनी यापूर्वीही मतदारयादी आणि एसआयआरच्या प्रक्रियेवर आक्षेप घेतले आहेत.

दरम्यान, निवडणूक आयोगाने 'इंडियन एक्स्प्रेस'च्या तपासणीत नमूद केलेल्या १४ नोंदींचे अस्तित्व, तारखा किंवा मजकूर नाकारलेला नाही; मात्र त्या 'सूचना' होत्या आणि मागील वर्षभरातील सर्व निर्णय एकमताने झाले असल्याचे आयोगाने म्हटले आहे. फॉर्म-६मध्ये बदल कोणी केला, पश्चिम बंगालमधील अपिले कोणी दाखल केली किंवा मे ते ऑगस्टदरम्यान पूर्ण आयोगाची बैठक का झाली नाही, या प्रश्नांवर मात्र स्पष्ट उत्तर दिले गेले नसल्याचे 'इंडियन एक्स्प्रेस'ने नमूद केले आहे.

घटनात्मक संस्थेच्या विश्वासार्हतेची कसोटी- निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनीच जर वारंवार निर्णयप्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित केले असतील, तर हा केवळ व्यक्तींमधील मतभेदांचा विषय न राहता संस्थात्मक पारदर्शकतेचा प्रश्न बनतो. मतदारयादी ही निवडणूक प्रक्रियेची मूलभूत पायरी आहे. त्यामुळे मतदारांची नावे जोडणे, वगळणे, पुनर्स्थापित करणे, अपील हाताळणे आणि मतदार डेटाबेसची सुरक्षितता या सर्व बाबींमध्ये स्पष्ट नियम, जबाबदारी आणि पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे.

'इंडियन एक्स्प्रेस'च्या तपासणीने याच प्रक्रियेतील अंतर्गत मतभेद सार्वजनिक केले आहेत. दोन आयुक्तांनी १० महिन्यांत १४ वेळा आक्षेप नोंदविणे आणि अखेर कॅबिनेट सचिवांकडे धाव घेणे ही बाब निश्चितच गंभीर संस्थात्मक प्रश्न उपस्थित करणारी आहे.

निवडणूक आयोगावरील जनतेचा विश्वास हा लोकशाहीच्या विश्वासाचा आधार आहे. त्यामुळे एसआयआर असो वा मतदारयादीतील बदलप्रत्येक निर्णयाची प्रक्रिया जनतेसमोर स्पष्ट होणे, आक्षेपांना उत्तर मिळणे आणि घटनात्मक संस्थेतील प्रत्येक सदस्याचा आवाज नोंदविला जाणे, हीच खरी लोकशाहीची कसोटी ठरणार आहे.

*** आहार, विहार, निद्रा ही त्रिसूत्री उत्तम.....**

पालेभाज्या, ऋतुनुसार फळे आणि सॅलडचा आहारात समावेश करावा. जंकफूड शक्यतो टाळावे, असा सल्ला डॉ. शेंडगे यांनी दिला. सकाळी उठल्यानंतर कोमट पाणी, दुपारी कोकम सरबत तसेच काकडी, टोमॅटो, गाजर, बीट यांसारख्या पदार्थांचा आहारात समावेश करावा. बदाम, अक्रोड, अंजीर, भोपळ्याच्या बिया यांसारखे नट्स आणि सीड्सही आहाराचा भाग असावेत. ऋतू बदलला की आहारातही बदल करावा. आपल्या प्रकृतीनुसार आहार निश्चित करणे गरजेचे आहे. 'आपला आहारच आपले औषध आहे,' असेही त्यांनी सांगितले.जेवताना मोबाईल किंवा टीव्ही पाहणे टाळावे. स्क्रीनटाइम कमी करावा. दररोज स्वतःसाठी किमान ३० मिनिटे देऊन स्ट्रेचिंग, डोळ्यांचे व्यायाम आणि पायांच्या बोटांवर चालण्यासारखे व्यायाम करावेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. सत्यजित वाघचवरे आणि डॉ. शुभांगी वाघचवरे यांनी दातांचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. प्रारंभी शिल्पा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. विद्या भगरे-भोसले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास मनोरमा मल्टिस्टेटच्या शाखांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वात्रटिका**

ट्रम्प आणि तुर्की
तुर्कीची तिरकस चाल
ट्रम्प तात्या खोटारडा...
एकाची बोंबाबोंब तर
दुसऱ्याचा
आरडाओरडा...।।
एक नाक खुपसतो
आणि
दुसरा म्हणे मला द्या
भाव...
नाक कापले
खुपसणाऱ्याचे
दुसरा जा,तू तुझ्या
गावाचा राव...।।

**हणमंत पडवळ -धाराशिव**
**८६९८०६७५६६**

# बळीराजाच्या मदतीसाठी शासन बांधावर; संकटाच्या काळात महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या पाठीशी !

शेतकऱ्याच्या शेतात उभे असलेले पीक म्हणजे केवळ शेतीतील उत्पादन नसते; त्यामागे संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने, मुलांच्या शिक्षणाची आशा, घरखर्चाची तरतूद आणि वर्षभराच्या कष्टाचे फळ दडलेले सते. त्यामुळे पावसाने दडी मारली, जमिनीतील ओलावा कमी झाला आणि डोळ्यांसमोर उभे असलेले पीक करपू लागले की त्याची झळ केवळ शेतापुरती मर्यादित राहत नाही. ती संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर परिणाम करत असते.

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासकीय अहवाल आणि आकडेवारी पुरेशी नसते. शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात पिकांची स्थिती, पाण्याची उपलबधता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. विशेषतः धाराशिव जिल्ह्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येतील आणि त्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. संकटाच्या काळात मदतीसाठी निधीची अडचण निर्माण होऊ नये आणि आवश्यक उपाययोजना वेळेत करता याव्यात, यासाठी शासनस्तरावर आवश्यक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टाचे अंतिम फलित पीक असते. तेच पीक संकटात सापडले तर त्याचा थेट परिणाम त्याच्या उत्पन्नावर होतो. त्यामुळे पीक नुकसानीबाबत शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्यात येईल, अशी महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा आधार मिळावा, यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे तो पिण्याच्या पाण्याचा. त्यामुळे

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यादरम्यान स्पष्ट केले. याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था केली जाणार आहे. दुष्काळाची झळ केवळ शेतीला बसत नाही, तर त्याचा परिणाम कुटुंबाच्या रोजच्या गरजांवरही होतो. त्यामुळे पाणी, चारा आणि अन्नधान्य या मूलभूत गरजांचा एकत्रित विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. मदत जाहीर झाल्यानंतर ती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे असते. या दृष्टीने शेतकऱ्यांना थेट मदत त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल आणि शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

संकटाच्या काळात आर्थिक मदत थेट शेतकऱ्यापर्यंत पोहोचल्याने त्याला तातडीच्या गरजा भागविण्यासाठी आधार मिळू शकतो. राज्यातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळसदृश परिस्थितीशी संबंधित उपाययोजनांची प्रक्रिया सुरू आहे. बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी, पंचनामे आणि मदतीसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही यांचा आढावा घेतला जात आहे. दुष्काळ निवारणासाठी मंत्रिमंडळ उपसमितीही स्थापन करण्यात आली असून परिस्थितीनुसार पुढील निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंद्राच्या मदतीची प्रक्रिया सुरू असतानाच राज्यस्तरावरही आवश्यक उपाययोजनांची तयारी ठेवण्यात आली आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत सर्वात मोठी चिंता पाण्याची असते.

पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि पाणी, उपलब्ध जलसाठ्यांचे नियोजन तसेच पुढील काळातील गरजा यांचा विचार करावा लागतो. पावसाच्या खंडाचा परिणाम केवळ चालू खरीप हंगामापुरता मर्यादित राहत नाही; त्याचा परिणाम पुढील हंगामाच्या नियोजनावरही होऊ शकतो. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्यांचा योग्य वापर आणि भविष्यातील पाणी-चारा गरजांचे नियोजन करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेताना पीक विमा, आपत्ती निवारणाच्या तरतुदी आणि शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या मदतीचाही विचार केला जात आहे. बाधित भागातील वस्तुस्थिती, पिकांचे नुकसान आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील मदतीबाबत निर्णय घेतले जात आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली मदत वेळेत मिळणे आणि त्यासाठीची प्रशासकी प्रक्रिया सुलभ राहणे महत्वाचे ठरते.

या संकटाच्या काळात शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यालाही विशेष महत्व आहे. करपलेली पिके, कोरडी पडलेली शेतजमीन, पाण्याची चिंता आणि पुढील हंगामाचे नियोजन या सगळ्याचा परिणाम शेतकरी कुटुंबावर होत असतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकून घेणे आणि त्यानुसार प्रशासनाला आवश्यक सूचना देणे हा संकट व्यवस्थापनातील महत्वाचा भाग ठरतो. मुख्यमंत्र्यांचा लातूर, धाराशिव आणि सोलापूर दौरा याच दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

दरम्यान, राज्यातील इतर भागांतील परिस्थितीचाही शासनस्तरावर आढावा घेतला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील कलोरी तसेच मोताळा तालुक्यातील खडकी खामखेड, रोहिनखेड व टाकळी येथे व अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील धधम व व्याळा या गावांना भेट देऊन पाहणी केली आणि बळीराजाला धीर दिला. तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीसमोर पावसाच्या अनिश्चिततेचे मोठे आव्हान उभे आहे. अशा वेळी शेतकऱ्याच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद, वेळेवर मदत, पाणी आणि चाऱ्याचे नियोजन तसेच पुढील हंगामासाठी आवश्यक आधारव्यवस्था या बाबी महत्त्वाच्या ठरतात. राज्य शासन आणि प्रशासनाच्या उपाययोजनांचा केंद्रबिंदू शेतकरी आणि त्याचे कुटुंब राहणे आवश्यक आहे. बळीराजाच्या बांधावर पोहोचून परिस्थिती समजून घेणे म्हणजे केवळ पाहणी नव्हे, तर प्रत्यक्ष वास्तव निर्णयप्रक्रियेपर्यंत पोहोचवण्याची प्रक्रिया आहे. आज शेतकरी ज्या परिस्थितीतून जात आहे, त्याची तीव्रता लक्षात घेऊन मदतीची अंमलबजावणी वेळेत आणि प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाच्या निर्णयांसोबतच प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी आणि स्थानिक पातळीवरील समन्वयही तितकाच महत्त्वाचा आहे. शेतकऱ्याच्या कष्टाचे आणि नुकसानीचे योग्य मूल्यमापन करून त्याला उपलब्ध असलेल्या मदतीचा लाभ वेळेत मिळणे, हीच या संपूर्ण प्रक्रियेची खरी कसोटी ठरणार आहे. पीक नुकसानीसाठी सरसकट मदत, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य, जनावरांसाठी चारा, शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था तसेच थेट खात्यात जमा होणारी मदत या माध्यमातून संकटाच्या काळात शेतकरी कुटुंबाला आधार देण्याचा हा प्रयत्न आहे.

बळीराजाच्या शेतात पुन्हा हिरवाई यावी, त्याच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळावे आणि पुढील हंगामासाठी त्याचा विश्वास कायम राहावा, यासाठी तातडीच्या उपाययोजनांसोबतच पुढील काळाचे नियोजनही आवश्यक आहे.

आजच्या परिस्थितीत शासन, प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा यांच्यातील समन्वय महत्वपूर्ण ठरणार आहे. बळीराजा संकटात असताना घेतलेले निर्णय आणि तो शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्याचा वेग, या दोन्ही गोष्टी महत्वाच्या असतात.

महाराष्ट्राचा शेतकरी संकटांना न घाबरता पुन्हा उभा राहण्याची ताकद ठेवतो. त्याला गरज आहे ती योग्य वेळी मिळणाऱ्या आधाराची. बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य यावे, त्याच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदावी, त्याच्या कुटुंबाच्या डोळ्यांत पुन्हा सुखी भविष्याची स्वप्ने दिसावीत आणि त्याच्या कष्टाला योग्य आधार मिळावा, यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे.

शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आज बळीराजाच्या बांधावर पोहोचलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्याला एकच विश्वास देत आहेत - संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

**- वर्षा फडके - आंधळे**
**उपसंचालक (वृत्त) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# महावितरणच्या लेखी आश्वासनानंतर भा. लो.युवा महासंघाचे आंदोलन स्थगित



सोलापूर(कटूसत्य वृत्त):- कॉ. गोदूताई परुळेकर नगर, कुंभारी येथील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, मीनाक्षीताई साने फिडरवरील वारंवार होणारे लाईन फॉल्ट, देखभालीचा अभाव तसेच चार-पाच महिन्यांपासून नागरिकांना वीजबिले न मिळण्याच्या प्रश्नावर (ऊध्रङ्घख) भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाच्या वतीने गुरुवारी (दि. २४ सप्टेंबर) महावितरण कार्यालयावर जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कॉ.बापू साबळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनाच्या सुरुवातीला जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलकांनी महावितरण कार्यालयात प्रवेश करून नागरिकांच्या वीज समस्यांबाबत प्रशासनाचा निषेध केला. यावेळी मीनाक्षीताई साने फिडरवरील तांत्रिक बिघाड कायमस्वरूपी दूर करावा, नियमित प्रतिबंधात्मक देखभाल करावी,

वीजबिले वेळेवर मिळावीत तसेच वीजबिलांचे गट्टे जाळल्याच्या कथित प्रकाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. आंदोलनाची दखल घेत महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांनी दि. २६ सप्टेंबर रोजी कॉ. गोदूताई परुळेकर नगरातील नागरिकांच्या विद्युत समस्यांबाबत तसेच युवा महासंघाच्या मागण्यांवर विशेष बैठक घेण्याचे लेखी आश्वासन दिले. या लेखी आश्वासनानंतर युवा महासंघाने सदर आंदोलन तात्पुरते स्थगित केले. यावेळी युवा महासंघाचे केंद्रीय समिती सदस्य ड. अनिल वासम यांनी, लेखी आश्वासनाची प्रभावी अंमलबजावणी करून १५ दिवसांच्या आत नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष सोडवाव्यात. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला.

दरम्यान, केवळ बैठक घेऊन प्रश्न प्रलंबित ठेवण्याऐवजी प्रत्यक्ष विद्युत यंत्रणेची पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी केली आहे.

यावेळी शिष्टमंडळात युवा महासंघाचे राज्य समिती सदस्य विजय हरसुरे व दिनेश बडगु, चंटी बिटला, अमित मंचले, विजय साबळे एजाज खलिफा आदींची उपस्थिती होती.

# नगरपालिकेच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्या-महेश रोकडे



पंढरपूर(कटूसत्य वृत्त):- शहरी भागातील नागरिकांचे राहणीमान सुधारण्यासाठी, पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या वतीने विविध शासकीय व स्थानिक पातळीवरील कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा लाभ शहरातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन मुख्यधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे. गणेशोत्सवातील भक्तीमय वातावरणाला लोकहिताच्या संवादाची जोड देत शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत संभाजी नगर, पंढरपूर येथील छत्रपती संभाजी नगर, गणेश उत्सव तरुण मंडळात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी 'दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान' अंतर्गत बेरोजगार तरुणांना मोफत कौशल्य प्रशिक्षण, 'प्रधानमंत्री आवास योजना - शहरी' अंतर्गत शहरातील बेघर आणि कच्च्या घरात राहणाऱ्या पात्र कुटुंबांना पक्के घर बांधण्यासाठी थेट आर्थिक अनुदान, शहरातील गरीब व गरजू रुग्णांसाठी पालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचारांची सोय, सफाई कामगारांसाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना, निराधार, वृद्ध आणि दिव्यांग नागरिकांसाठी श्रावणबाळ योजना व संजय गांधी निराधार योजना, 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०' आणि 'नगरोत्थान महाभियान' अंतर्गत शहरात नवीन अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा वाहिनी, सांडपाणी व्यवस्थापन आणि वस्ती सुधार योजनांबाबत माहिती दिली. यावेळी मोबाईल आणि इंटरनेट हे ज्ञान व माहिती मिळविण्याचे प्रभावी साधन असले, तरी त्याचा अतिवापर विद्यार्थ्यांसाठी घातक ठरू शकतो. सोशल मीडियावर अनावश्यक वेळ न घालवता विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर प्रामुख्याने अभ्यास आणि आवश्यक माहिती मिळविण्यासाठी करावा. तसेच इंटरनेट वापरताना वैयक्तिक व गोपनीय माहिती सुरक्षित ठेवण्याची विशेष काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रेय लेंडवे यांनी यावेळी केले. कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक पंकज गाडेकर, माजी नगरसेवक अभिमन्यू साबळे, आनंता साबळे, पांडूरंग वरपे, गणेश परेदशी, रवी साबळे, अतुल जाधव, पैगंबर मणेरी, बापू देवकर, संदीप साबळे, ड.पुजारी, गणेश कोळी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३

फोन- २१७३५५०५९२ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**

It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-2173550592 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# जाचक अटींशिवाय दुष्काळ जाहीर करून हेक्टरी १ लाखाची मदत द्या

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- मोहोळ विधानसभा मतदारसंघात पावसाने यंदा पूर्णपणे हुलकावणी दिल्याने भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतातील उभी पिके जळून गेली असून पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकरी प्रचंड अडचणीत आहेत. त्यामुळे कडक निकष किंवा जाचक अटी न लावता 'दुष्काळ' घोषित करून शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी १ लाख रुपयांची मदत तातडीने द्यावी, अशी आग्रही मागणी आमदार राजू खरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोहोळ मतदार संघातील कारंबा ( उ. सोलापूर) येथे भेट देऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली.



त्यांच्यासमवेत पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख, जि.प. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन उपस्थित होते. यावेळी आ. खरे यांनी मतदारसंघांतर्गत मोहोळ तालुक्यातील १०४, पंढरपूरच्या १७ आणि उ. सोलापूरच्या २४ गावांमधील दुष्काळाचे विदारक वास्तव मांडले. तसेच लेखी निवेदन देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची आग्रहीमागणी केली. आ. खरे यांनी नमूद केले -की, गतवर्षी या भागात अतिवृष्टी आणि महापुराने थैमान घातले होते, तर चालू वर्षात पावसाने अत्यंत निराशा केली आहे. ऐन पावसाळ्यात तीन महिने पाऊसच न पडल्यामुळे खरीप हंगामातील सोयाबीनसह इतर पिकांची उगवण झाली नाही. अनेक ठिकाणी उगवलेली पिके पाण्याअभावी करपून गेली पाणी टँकर व चारा छावण्या सुरू कराव्यात शेतकरी आणि पशुपालक सध्या जगण्याच्या संघर्षात अडकले आहेत. प्रशासकीय दिरंगाई न करता राज्य सरकारने तात्काळ संबंधित विभागांना पंचनामे करण्याचे आणि टँकर तसेच चारा छावण्या सुरू करण्याचे आदेश द्यावेत. आमदार राजू खरे आहेत. ज्या शेतकऱ्यांनी धाडस करून दुबार पेरणी केली होती, त्यांचेही अतोनात नुकसान झाले आहे. विहिरी आणि बोअरवेलच्या पाणी पातळीत प्रचंड घट झाली आहे. शेतमजुरांच्या हाताला काम मिळण्यासाठी तात्काळ रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावीत, अशा मागण्या आ. खरे यांनी निवेदनाद्वारे केल्या.

# विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांची बैठक संपन्न

पुणे (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर मतदार संघ आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे आदर्श आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू झाली आहे. त्यानुसार सर्व राजकीय पक्षांनी भारत निवडणूक आयोगाच्या आचारसंहितासंबंधित निर्देशांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली - उगले यांनी केले आहे.

या निवडणुकीत मतदान करता यावे म्हणून नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या १० दिवस अगोदरपर्यंत नवीन मतदार नोंदणीसाठीच्या दाखल अर्जांवर कार्यवाही करता येईल, अशी माहितीदेखील त्यांनी दिली. भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकांची घोषणा मंगळवारी (दि. २२ सप्टेंबर) केली आहे. या निवडणूक कार्यक्रमाची व निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांची माहिती राजकीय पक्षांना देण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत



त्या बोलत होत्या.

यावेळी विभागातील पुणे जिल्ह्यातील राजकीय पक्षांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष तर सोलापूर, सातारा, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. पाचही जिल्ह्यातील जिल्हा निवडणूक प्रशासन, पोलीस प्रशासन, महानगरपालिका आदींचे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सार्वत्रिक वा पोटनिवडणुकांसाठींच्या आचारसंहिताविषयक तरतुदी या निवडणुकीसाठीही लागू असतात, अशी माहिती देऊन विभागीय आयुक्त म्हणाल्या, या आचारसंहिता विषयक तरतुदींचे मार्गदर्शक पुस्तिका जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून तसेच आयोगाच्या आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावरून उपलब्ध होतील. विभागातील सर्व जिल्हाधिकारी हे त्या- त्या जिल्ह्यासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी असणार आहेत.

त्यांनी पुढे सांगितले, या निवडणुकीसाठी मतदान करता यावे यासाठी नव्याने मतदार नोंदणीची संधी सर्वसाधारणपणे २६ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. यासाठीचे अर्ज पदनिर्देशित अधिकाऱ्यांकडे जमा करावेत. त्यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयात उपलब्ध आहे. जानेवारी २०२६ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीनुसार पुणे विभागात ३ लाख ७ हजार ८२३ पदवीधर तर ५१ हजार ७५० शिक्षक मतदार आहेत. त्यानंतर झालेल्या मतदार नोंदणीची व नव्याने २६ सप्टेंबरपर्यंत होणाऱ्या मतदार नोंदणीनुसार मतदार संख्येत बदल होणार असून त्याप्रमाणे मतदारांना मतदान करता येणार आहे. या निवडणूकीतील मतदान मतपत्रिकेद्वारे पसंतीक्रम नोंदवून करण्यात येते. त्यादृष्टीने निवडणूक प्रशासन जनजागृती करत आहे. राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी नामनिर्देशन दाखल करताना घ्यावयाची काळजी, छाननी, निवडणूक खर्चावरील मर्यादा आदींचे पालन करावे. त्याबाबत सर्व सूचना आयोगाच्या मार्गदर्शक पुस्तिकांमध्ये उपलब्ध आहेत, त्यानुसार कार्यवाही करावी, असे आवाहनही श्रीमती तेली-उगले यांनी केले.

यावेळी राजकीय पक्षांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन विभागीय आयुक्तांनी केले. असा आहे निवडणूक कार्यक्रम:

निवडणुकीची अधिसूचना २९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२६ आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे.

# 'सोलापूर पर्यटन सप्ताह'तून जिल्ह्याच्या बहुआयामी पर्यटनाला मिळणार चालना

सोलापूर(कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन क्षमता नागरिक, विद्यार्थी, पर्यटक तसेच पर्यटन क्षेत्रातील विविध घटकांपर्यंत व्यापक स्वरूपात पोहोचविण्याच्या उद्देशाने दि. २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सोलापूर पर्यटन सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा प्रशासन, पर्यटन संचालनालय, पुणे आणि एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प (ITDP), सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील कृषी, ग्रामीण, निसर्ग, वन्यजीव आणि सांस्कृतिक पर्यटनाला विशेष प्रोत्साहन देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्याची पर्यटन ओळख अधिक व्यापक करण्यासाठी विशेष घटक आधारित गावे (TBA) या उपक्रमाशीही या सप्ताहाची सांगड घालण्यात आली आहे. पाच गावांमध्ये विशेष पर्यटन अनुभव १.भालेवाडी, ता. मंगळवेढा - दूध व मिलेट पर्यटन : भालेवाडी येथे दूध व मिलेटवर आधारित ग्रामीण पर्यटनाचा अनुभव पर्यटकांना घेता येणार आहे. मालदांडी ज्वारी, स्थानिक कृषी पद्धती, पशुपालन, ग्रामीण जीवनशैली तसेच स्थानिक उत्पादनांची माहिती पर्यटकांना करून देण्यात येणार आहे. २.बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर - गवताळ सफारी : बोरामणी येथे गवताळ सफारीच्या माध्यमातून गवताळ परिसंस्था, जैवविविधता आणि निसर्ग पर्यटनाचा अनुभव

> सोलापूर पर्यटन सप्ताहाच्या माध्यमातून जिल्ह्यातील कृषी, ग्रामीण, निसर्ग, वन्यजीव आणि सांस्कृतिक पर्यटनाला व्यापक व्यासपीठ मिळणार आहे. नागरिक, विद्यार्थी व पर्यटनप्रेमींनी पर्यटन सप्ताहासोबतच रील व छायाचित्रण स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घ्यावा आणि आपल्या नजरेतून सोलापूरचे पर्यटन जगासमोर आणावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी केले आहे.

देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ३.नान्नज, ता. उत्तर सोलापूर - माळढोक अभयारण्य : नान्नज परिसरातील माळढोक अभयारण्य हे वन्यजीव व निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण आहे. माळढोक व इतर पक्षी, गवताळ अधिवास आणि वन्यजीव संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांना व पर्यटकांना माहिती देण्यात येणार आहे. ४.चिंचणी, ता. पंढरपूर - कृषी व ग्रामीण पर्यटन : चिंचणी येथे ग्रामीण जीवनशैली, कृषी आधारित उपक्रम, स्थानिक संस्कृती तसेच ग्रामस्थांच्या सहभागातून विकसित होणाऱ्या पर्यटन अनुभवांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. ५.लोंढेवाडी, ता. माढा - कृषी व ग्रामीण पर्यटन : लोंढेवाडी येथील कृषी व ग्रामीण पर्यटन केंद्राच्या माध्यमातून शेती, ग्रामीण जीवन, स्थानिक खाद्यसंस्कृती आणि ग्रामीण उपक्रमांचा प्रत्यक्ष अनुभव पर्यटकांना देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुभवाधारित सहलींवर भर पर्यटन सप्ताहाच्या निमित्ताने जिल्ह्यातील निवडक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व अनुभवाधारित सहलींचे आयोजन करण्यात येणार आहे. या सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कृषी, ग्रामीण अर्थव्यवस्था, जैवविविधता, वन्यजीव, स्थानिक संस्कृती आणि पर्यटन व्यवसायाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. या उपक्रमांतर्गत स्थानिक शेतकरी, महिला बचत गट, पर्यटन केंद्र चालक आणि ग्रामीण उद्योजक यांच्याशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून आणण्यात येणार आहे. तसेच स्थानिक खाद्यसंस्कृतीचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी स्थानिक अल्पोपहार उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. 'आपल्या नजरेतलं सोलापूर' या संकल्पनेवर रील व छायाचित्रण स्पर्धा सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनस्थळे, निसर्ग, संस्कृती, ग्रामीण जीवनशैली, ऐतिहासिक व धार्मिक वारसा तसेच स्थानिक पर्यटन अनुभव नागरिकांच्या नजरेतून जगासमोर आणण्यासाठी रील आणि छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धकांनी सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनाशी संबंधित आपले रील्स व छायाचित्रे itdpsolapurgmail.com या ई-मेलवर दि. ४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सादर करावीत. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रांचे वितरण दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे करण्यात येणार आहे. या स्पर्धेत विद्यार्थी, युवक, छायाचित्रकार, सोशल मीडिया क्रिएटर्स तसेच पर्यटनप्रेमींनी सहभागी होऊन 'आपल्या नजरेतलं सोलापूर' ही संकल्पना प्रभावीपणे मांडावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्थानिक पर्यटनासोबत रोजगाराच्या संधींनाही चालना सोलापूर जिल्ह्याची पर्यटन ओळख केवळ धार्मिक पर्यटनापुरती मर्यादित न ठेवता कृषी, ग्रामीण, निसर्ग, वन्यजीव आणि सांस्कृतिक पर्यटनाचा समावेश असलेले बहुआयामी पर्यटन गंतव्य म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे स्थानिक शेतकरी, महिला बचत गट, स्वयं-सहायता गट, ग्रामीण उद्योजक आणि पर्यटन सेवा पुरवठादारांना पर्यटनाशी जोडून स्थानिक रोजगार व उत्पन्नाच्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील नागरिक, विद्यार्थी, शैक्षणिक संस्था, पर्यटन व्यावसायिक, सोशल मीडिया क्रिएटर्स आणि पर्यटकांनी 'सोलापूर पर्यटन सप्ताह'मध्ये सहभागी होऊन जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळांचा अनुभव घ्यावा तसेच रील व छायाचित्रण स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चांदापुरी येथे कायदेविषयक कार्यशाळा संपन्न

अकलूज(कटूसत्य वृत्त):- विद्यार्थ्यांच्या मनात कायद्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी,आपल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव व्हावी आणि बदलत्या काळातील कायदेशीर आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम नागरिक घडावेत.

या उद्देशाने विधी सेवा फाऊंडेशनच्या वतीने सदाशिवराव देठे निवासी प्रशाला व ज्युनिअर कॉलेज चांदापुरी येथे कायदेविषयक जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना भारतीय संविधान,पोक्सो कायदा,विद्यार्थ्यांचे कायदेशीर हक्क व



जबाबदाऱ्या,सायबर सुरक्षा,महिलांचे व बालकांचे संरक्षण करणारे कायदे तसेच दैनंदिन जीवनात कायद्याचा उपयोग याबाबत अत्यंत सोप्या व संवादात्मक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले.अडचण निर्माण झाल्यानंतर कायदा शोधण्यापेक्षा,अडचण येण्यापूर्वी कायदा समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.या भूमिकेतून विद्यार्थ्यांना विविध कायदेशीर बाबी समजावून सांगण्यात आल्या.विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न उपस्थित केले.त्यांच्या प्रश्नांना उपस्थित विधिज्ञांनी कायदेशीर मार्गदर्शनातून उत्तरे दिली.कायदा प्रत्येकासाठी,न्याय सर्वांसाठी या संकल्पनेतून विधी सेवा फाऊंडेशनकडून राबविण्यात येणाऱ्या कायदेविषयक जनजागृती अभियानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी विधी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष ड. धनंजय बाबर,उपाध्यक्ष ड. भारत गोरवे,सचिव ड.सुमित सावंत,खजिनदार ड.वैशाली कांबळे,सहसचिव ड.गोपाळ लावंड, संस्थापक सदस्य ड. अभिषेक चंदनशिवे व ड. सुप्रिया पोळ उपस्थित होते. कार्यशाळेच्या आयोजनासाठी सहकार्य केल्याबद्दल शाळेचे अध्यक्ष डॉ. कुमार लोंढे यांनी आभार मानले.

# सोलापूरच्या सर्वांगीण विकासाचा लढा पुढे नेणे हीच विजय जाधवांना खरी श्रद्धांजली

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शहराच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेले युवा समाजसेवक तथा सोलापूर विकास मंचचे सक्रिय सदस्य कै. विजय कुंदन जाधव यांच्या अपघाती निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे.

सोलापूरची सर्वच क्षेत्रांत होणारी अधोगती थांबवून शहराला प्रगतीपथावर नेण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा निर्धार शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी व्यक्त केला.

सोलापूर विकास मंचच्या वतीने रंगभवन चौकातील समाज कल्याण केंद्र हॉल येथे आयोजित शोकसभेत मान्यवर बोलत होते. या शोकसभेस शहर व जिल्ह्यातून सामाजिक, राजकीय, वैद्यकीय, विधी आणि उद्योग क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कै. विजय जाधव यांच्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली वाहिली. अपघाताची चौकशी आणि रस्त्याला नामांतराची मागणी




शोकसभेत बोलताना उपस्थितांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. कै. विजय जाधव यांच्या जाण्याने सोलापूर विकास मंचची आणि संपूर्ण सोलापूरची मोठी बौद्धिक हानी झाली आहे. ज्या रस्त्यावर त्यांचा दुर्दैवी अपघात झाला, त्या ठिकाणी भविष्यातील अपघात रोखण्यासाठी तातडीने गतिरोधक बसवण्यात यावेत, तसेच सदर रस्त्यास 'दिवंगत विजयराव जाधव मार्ग' असे नाव देण्यात यावे, अशी एकमुखाने मागणी करण्यात आली. यासोबतच या अपघाताची प्रशासनाकडून सखोल चौकशी करण्यात यावी, असा सूरही उपस्थितांमधून उमटला. मान्यवरांची मोठी उपस्थिती या शोकसभेस कै. विजय जाधव यांच्या मातोश्री, भगिनी, मामा, मामी यांच्यासह संपूर्ण कुटुंबीय उपस्थित होते.

तसेच मिलिंद भोसले, प्रकाश कांबळे, शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे, भारत पाटील, जयश्री तासगावकर, गौरी आंबेकर, सुधा पाटील, शैलेंद्र क्षीरसागर, मनोज क्षीरसागर, सुहास भोसले, योगीन गुर्जर, केतन शहा, नरसिंग मेंगजी, गणेश पेनगोंडा, डॉ. दिलीप बोर्डे, सूर्यकांत पारेकर, लिंगराज गुडूर, डॉ. संदीप आडके, ड. राजन दीक्षित, राजेश खरात, रमेश तिवारी, विठ्ठल लहाने, बागवान डोलाज, विजय बाहेती, धनश्री केळकर, मधुसूदन गुंडेती, प्रशांत भोसले, अशोक धुळगाव, प्रसन्न नाजरे, अमोघसिद्ध कोरे, साहेबराव पाटील, मनोज गायकवाड, प्रदीप शिर्के, पंकज चिंदरकर, राजकुमार कोळी, सुमंग गोयल, डॉ. बाहुबली दोशी, प्रतीक्षा जोशी, संतोष माने, बाळासाहेब मोरे, जी. के. देशमुख, राजेंद्र बिराजदार, प्रीती गायकवाड, महेश चिंचोळे, नागेश राजगुरू, माऊली पवार, सचिन पवार, रमेश वायचळ, घनश्याम दायमा, अतुल देशपांडे, मनोज देवकर, संतोष कांबळे, नागेश अकालदेवटे, प्रकाश भुतडा, शेखर बंगाळे, अर्जुन रामगीर, हुसेन नदाफ, डॉ. राजेश पडळकर, आनंद गायकवाड, अभिजीत मनमोहन, गुरुकुल गड्डम, पीआय महेश कराळे, महेश कासट, यशपाल चितापुरे, उदय चाकोते, ड. खतीब यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रांतील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांगी तलाव परिसरातील शेतीपंपांचा वीजपुरवठा आठ तास करण्याची मागणी

## अन्यथा शेतकऱ्यांचे बेमुदत उपोषण

करमाळा (कटूसत्य वृत्त):- मांगी तलाव परिसरातील शेतीपंपांचा वीजपुरवठा पूर्वीप्रमाणे आठ तास करण्यात यावा, या मागणीसाठी परिसरातील शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे निवेदन दिले आहे. सध्या पावसामुळे शेतकऱ्यांची बिकट अवस्था असून, मांगी तलाव लाभक्षेत्रातील ऊस, कांदा तसेच जनावरांच्या चाऱ्याची पिके उभी आहेत. अशा परिस्थितीत शेतीपंपांचा वीजपुरवठा पूर्ववत आठ तास करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनानुसार, महावितरणकडून कोणतीही पूर्वकल्पना न देता नियमबाह्य पद्धतीने वीजपुरवठा खंडित केला जात असल्याचा आरोप मांगी तलाव परिसरातील शेतकऱ्यांनी केला आहे. वीजपुरवठा कमी झाल्यामुळे उभ्या पिकांना आवश्यक पाणी देणे अडचणीचे होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे



आहे. मांगी तलाव लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना पूर्वीप्रमाणे आठ तास वीजपुरवठा मिळत होता. मात्र, सध्या वीजपुरवठ्यात कपात होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून मांगी तलावावरील शेतीपंपांचा वीजपुरवठा पूर्वीप्रमाणे आठ तास सुरू करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागणीची अंमलबजावणी न झाल्यास उपोषण- शेतकऱ्यांनी निवेदनातून स्पष्ट इशारा देत म्हटले आहे की, मांगी तलाव परिसरातील शेतीपंपांचा वीजपुरवठा पूर्वीप्रमाणे आठ तास करण्याच्या सूचनेची अंमलबजावणी झाली नाही, तर परिसरातील शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करून बेमुदत उपोषण करण्यात येईल.

या पार्श्वभूमीवर संबंधित महावितरण अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देऊन शेतीपंपांचा वीजपुरवठा पूर्ववत आठ तास करण्याची मागणी तहसील प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

२८ सप्टेंबरला तहसील कार्यालयासमोर उपोषण...

निवेदनात नमूद केल्यानुसार, मागणीची पूर्तता न झाल्यास सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून करमाळा तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे. शेतीपंपांच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडवून पूर्वीप्रमाणे आठ तास वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मांगी तलाव परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. आता प्रशासन आणि महावितरण या मागणीबाबत काय भूमिका घेतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# नगरसेवक मोहसीन शेख यांच्या संकल्पनेतून नागरिक सुविधा विशेष अभियानाचे आयोजन

अकलूज(कटूसत्य वृत्त):- अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक मोहसीन शेख यांच्या संकल्पनेतून नागरिक सुविधा विशेष अभियानाचे आयोजन, सहायता वेल्फेअर फाऊंडेशन यांच्या वतीने, रविवार दिनांक २७.०९.२०२६ रोजी, सकाळी १० वा. ते दुपारी ३ वा. पर्यंत करण्यात आले असल्याची माहिती अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक मोहसीन शेख यांनी दिली.



सदरचे अभियान अकलूज नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा रेश्माताई लालासाहेब अडगळे व गटनेते तथा उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली,तर प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक मोहसिन शेख व नगरसेविका मंदाकिनी पाडोळे यांच्या नेतृत्वाखाली होणार असून,

१८ वर्षांवरील युवक व नागरिकांसाठी विशेष सुविधा सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेवक मोहसीन शेख यांनी केले आहे.

सदरच्या अभियानात नवीन मतदार नोंदणी

१८ वर्षे पूर्ण झालेल्या युवक-युवतींसाठी नवीन मतदार नोंदणी. रेशन कार्ड e-KYC शिधा लाभ सुरळीतपणे मिळण्यासाठी रेशन कार्ड e-KYC. आयुष्मान कार्ड

पात्र लाभार्थ्यांसाठी ५ लाखांपर्यंत आरोग्य उपचाराचा लाभ होतो असे सहायता वेल्फेअर फाऊंडेशनने सांगितले.